पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १७/४/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५५**

मा.धीरज घाटे व मा.राजाभाऊ बराटे यांचे दि. १०/४/२०१८ चे पत्र.

तळजाई टेकडीवरील पुणे महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या जलतरण तलावात बुडून तरूणाचा मृत्यू झाला. सदर तरूण हा माझ्या प्रभागातील म्हणजेच दत्तवाडी भागात राहणारा होता. प्रफुल्ल भीमराव वानखेडे असे त्याचे नाव असून, तो केवळ २१ वर्षांचा होता.

तळजाई स्पोर्ट कॉम्पलेक्स मधील ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे प्रफुल्लचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासणीत निष्पन्न झाले आहे. प्रफुल्लच्या वडिलांचे काही वर्षांपूर्वीच निधन झाले होते. त्याची आई घरकाम करून संसाराचा गाडा हाकते. त्याचा मोठा भाऊ इलेक्ट्रिशियन म्हणून काम पाहतो. प्रफुल्लच्या संदर्भात घडलेली दुर्घटना लक्षात घेता महापालिकेच्या वतीने त्याच्या कुटुंबियांना पाच लाख रूपयांची आर्थिक मदत देण्यात यावी.

**विषय क्र. ५६**

मा.योगेश ससाणे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ११/४/२०१८ चे पत्र.

पुणे महापालिकेने मुंढवा जॅकवेल हा प्रकल्प कोटयावधी रूपये खर्च करून बनविला आहे. या जॅकवेलमधून निघणारे पाणी दूषित असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर दूषित पाणी हे हडपसर साडेसतरा नळी महादेवनगर येथील बेबी कॅनॉल मधून उघडयावरून वाहत आहे. यामुळे आजूबाजूच्या परिसरातील कूपनलिकांना येणारे पाणी दूषित होवून येत आहे. सबब हडपसर परिसरातील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर मुंढवा जॅकवेल मधून वाहणारे पाणी हे बंदनलिकेतून नेणे बंधनकारक आहे. यासाठी र.रू. २० कोटीची आर्थिक तरतूद उपलब्ध करून दयावी. तसेच सदरचे काम तातडीने करण्यात यावे.

**विषय क्र. ५७**

मा.योगेश ससाणे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ११/४/२०१८ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या नुकतेच ११ गावांचा समावेश झाला असून फुरसुंगी व उरूळी देवाची या गावाचा समावेश झाला आहे. या फुरसुंगी उरूळी देवाची गावाच्या हद्दीतून ओढा जात आहे. या ओढयातून जाणारे मैलापाणी मुळे आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या ओढयालगत मलवाहिनी टाकणे अत्यावश्यक झालेले आहे. या ओढयातून मैलापाणी नदीमध्ये जात असून नदी देखील दूषित होत आहे.

सबब फुरसुंगी उरूळी देवाची गावाच्या यापासून मुळा मुठा नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे हे काम तातडीने करणेसाठी र.रू.२० कोटी उपलब्ध करून देण्यात यावेत व त्वरीत सदरचे काम करण्यात यावे.

**विषय क्र. ५८**

मा.योगेश ससाणे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ११/४/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेने सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये पुणे मनपाच्या सभासदांना त्यांच्या प्रभागातील कचरा गोळा करण्याकरीता सुमारे र.रू. ९ ते १० कोटी रूपयांची स यादीमधून छोटा हत्ती वाहन खरेदी करण्याकरीता तरतूद केलेली होती. परंतु, पुणे मनपाचे आयुक्त यांनी प्रस्तुत वाहन खरेदी करू नये असे आदेश पारीत केले होते. पुणे मनपाचे वाहन विभागाने मा. आमदार यांचे निधीतून वाहन खरेदी करण्यास परवानगी मागितली होती व त्यास मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. मा. आयुक्तांच्या आदेशामुळे सभासदांचे र. रू. ९ ते १० कोटी रूपयांचे बजेट हे लॅप्स झाले आहे. मा. आमदारांकरीता वेगळा न्याय व सभासदांकरीता वेगळा न्याय हा कायद्याला अभिप्रेत नाही. त्यामुळे र. रू ९ ते १० कोटी रूपयांची थांबविलेली वाहन खरेदी पुन्हा करावी व ती सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधून वजावट करू नये.

वाहन विभागातील जबाबदार अधिका-यास चुकीचा अभिप्राय देवून दिशाभूल केल्याबद्दल त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ५९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ४/११/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ४/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१३२६ दि. २०/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १४,३७,७०१/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ६०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ११/११/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.११/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१३२७ दि. २०/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ५,५४,००९/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ६१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १८/११/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.१८/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१३२८ दि. २०/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १३,८५,१९६/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ६२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २५/११/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.२५/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/८० दि. ९/४/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४०,०६,१९१/– चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ६३**

मा.प्र.उपआयुक्त(तांत्रिक) यांचे नियंत्रणाखालील महात्मा फुले मंडई विभागाकडील सन २०१३–१४ व २०१४–१५ मधील गाळाभाडे थकबाकी रकमांची तद्‍नुषंगिक उपलब्ध कागदपत्राधारे तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१५ दि. ३/४/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १ सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ६४**

२४ बाय ७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत यापूर्वी मनपाकडून २८१८ कोटींची काढण्यात आलेली निविदेच्या एस्टिमेटमध्ये तब्बल र.रू.२९० कोटी रूपयांची वाढ करणा–या या निविदेसाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास काळया यादीत टाकण्यात यावे व प्रकल्प सल्लागाराविरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा.अविनाश बागवे, मा.प्रिया गदादे, मा.रविंद्र धंगेकर, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.साईनाथ बाबर यांचे दि.१५/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२१ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/पापु/८३४ दि. १६/१/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या योजनांबाबत विधवा महिलांच्या अनुदानात र.रुपये ५,०००/- वाढ करुन र.रुपये १५,०००/- अनुदान देण्यात यावे व उर्वरित रक्कम शहरी गरीब आरोग्य योजनेकडे वर्ग करण्यात यावी तसेच मआ/सविवि/१९९ दि.२१/७/२०१७ चा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत यावा याबाबत झालेला पक्षनेते सभा दि. ७/२/२०१८ चा निर्णय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६६**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील कामांसाठी नियुक्त तज्ञ सल्लागारांचे पॅनेल रद्द करुन निविदा पध्दतीने सल्लागारांची नियुक्ती करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/पापु/११३३ दि.६/३/२०१८ चे पत्र.

१)मा.स्थायी समिती ठराव क्र.९२ दि.२६/४/२०११ अन्वये गठीत करण्यात आलेले तज्ञ सल्लागारांचे पॅनेल आणि दर रद्द करणेस

२) पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील यापुढील प्रकल्पांकरीता सल्लागार नियुक्ती करीता केंद्रीय दक्षता आयोगाकडील मार्गदर्शक सुचनांचा अंतर्भाव करुन स्वतंत्रपणे निविदा प्रक्रिया राबविणेस

३) निविदेमध्ये प्राप्त होणाऱ्या न्युनतम दराने कामाचा मुशाहिरा नियुक्त सल्लागारात आदा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६७**

स्मार्ट सिटी ऑफिससाठी (सिटीझन इन्क्वायरी सेंटर) बाणेर स.नं. २९/१+२ येथे बांधण्यात आलेली नवीन क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीमधील काही भाग उपलब्ध करुन देणेबाबत मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०२ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११७७ दि. १३/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६८**

पुणे शहरातील मुख्य रस्त्याजवळील महत्वाच्या ११ ठिकाणी ईटॉयलेट उभारणे हे काम इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. या कंपनीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१३९१ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. या प्रस्तावास मान्यता मिळणेस व त्यानुसार १४ ई-टॉयलेट ११ ठिकाणी बसविण्याचा तसेच एक वर्ष विनामोबदला देखभाल करणेसाठी र.रुपये १,९९,१३,६००/- पर्यंत खर्च करणेस
२) सदर ई-टॉयलेटसाठी लागणारा खर्च हा पुणे खासदार फंडातून उपलब्ध करुन घेणेस तसेच इराम सायंटीफीक-सोल्यूशन्स प्रा.लि. व पुणे महानगरपालिका यांचेमध्ये करारनामा करणेस व बिल अदा करणेस
३) (टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६९**

४५ एमएलडी मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम मे.डिग्रीमोंट प्रा.लि. हे काम पाहत असून सदर कंपनीचे नाव मे सुएज इंडिया प्रा.लि. असे बदलण्यात आलेले असल्याने सदर कपंनीसोबत नविन नावाने म्हणजेच मे सुएज इंडिया प्रा.लि. या नावाने नव्याने कार्यादेश देण्यास त्यानुसार त्यांच्याशी नव्याने करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांचे बिल अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत-मलनि:सारण/१३९४ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१७ दि.१५/७/२०१४ अन्वये दि.१/८/२०१८ ते दि.३१/७/२०१९ पर्यंत ४५ एम एल डी मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करुन घेण्यास

२) मे.डिग्रीमोंट प्रा.लि. ऐवजी मे.सुएज इंडिया प्रा.लि. यांना दि.१/४/२०१७ ते दि.३१/७/२०१९ पर्यंत काम करण्यासाठी नव्याने/पुरवणी कार्यादेश देण्यास आणि त्यानुसार त्यांच्याशी पुरवणी करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी टेंडर क्र. – ९७९/२०१३-१४ मधील सर्व अटी व शर्तींना अधीन राहून अदा करणेस
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७०**

३२ एमएलडी विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे काम मे.डिग्रीमोंट प्रा.लि. हे काम पाहत असून सदर कंपनीचे नाव मे सुएज इंडिया प्रा.लि. असे बदलण्यात आलेले असून सदर कपंनीसोबत नविन नावाने म्हणजेच मे सुएज इंडिया प्रा.लि. या नावाने नव्याने कार्यादेश देण्यास त्यानुसार त्यांच्याशी नव्याने करारनामा करण्यास व नव्याने त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांचे बिल अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत-मलनि:सारण/१३९५ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६१ दि.२२/७/२०१७ अन्वये दि.१/७/२०१७ ते दि.३१/३/२०२० पर्यंत ३२ एमएलडी विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करुन घेण्यास
२) मे.डिग्रीमोंट प्रा.लि. ऐवजी मे.सुएज इंडिया प्रा.लि. यांना दि.१/७/२०१७ ते दि.३१/७/२०२० पर्यंत काम करण्यासाठी नव्याने/पुरवणी कार्यादेश देण्यास आणि त्यानुसार त्यांच्याशी पुरवणी करारनामा करण्यास व त्यांनी केलेल्या कामापोटी टेंडर क्र. – ९८३/२०१३-१४ मधील सर्व अटी व शर्तींना अधीन राहून अदा करणेस
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ७१**

आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. पुणे चे कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त सेवकांना अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत पुणे म.न.पा. मार्फत वैद्यकीय सेवा पुरविणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६ दि.५/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ७२**

पुणे पेठ बुधवार महात्मा फुले मंडई परिसरातील हुतात्मा बाबुगेनू (आर्यन) वाहनतळ विद्यमान ठेकेदार श्री.शारदा गजानन एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा. श्री.निखिल राजेंद्र जगताप यांना निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत अथवा पुढील ११ महिने कालावधी पेक्षा जास्त नाही या पैकी जी प्रक्रिया अगोदर घडेल तो पर्यतच्या कालावधीसाठी सन २०१७-१८ ची वार्षीक मक्ता र.रू.३१,३२,८००/- मध्ये पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देताना १०% वाढ करून म्हणजेच र.रू.३४,३३,९८०/- प्रमाणे त्यांना चालविणेस देण्यात येणार आणि त्यानंतर मिळकतीच्या विनियोगासाठी देणेकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
तरी सदरची बाब निर्दशनास आणणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/१० दि.१०/४/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**